# खडीसाखर

आदिती ऑफिस मधून घरी आली तेव्हा, अंधार पडायला लागला होता. पानगळीचा मोसम सुरु होऊन काहीच दिवस झाले तरीसुद्धा आठवडाभर सतत लागलेल्या पावसानं सारं गारीगार करून टाकलं होतं. चारपाच दिवसात तर सकाळचं ऊन दिसलंही नाही. पायात भिजलेल्या पानांचा भलामोठा खच आणि हवेत भरून राहिलेला काहीसा कुबट गंध. वातावरण अगदीच गच्चं होतं. रात्रीही भरभरून पाऊस पडण्याची चिन्ह दिसत होती. गाडी पार्क करून ती आत आली, घर रिकामंच होतं, आशिष ऋषीला घेऊन बाहेर गेला होता. अंधारलेलं घर अजूनच भकास वाटलं. संध्याकाळी घरी आल्यावर तरी हे दोघे घरीच असायला हवे, तिच्या डोक्यात विचार येऊन गेला. तो झटकून तिनं हातपाय धुतले आणि देवापुढे समई लावली. गॅसवर चहा ठेवला. तेवढ्यात वाऱ्याचा जोरात आवाज आला आणि पावसाची सर आली. आशिष बहुतेक खिडकी बंद करायला विसरला होता, ती पटकन खोलीतल्या खिडकीशी आली आणि खिडकी बंद केली. तोपर्यंत पावसाचे थेम्ब आत येऊन कार्पेट भिजलंच. तिनं पटकन टिश्यू आणून टिपून घेतलं. " इतका कसा हा वेंधळा, नेहमीचं आहे हे. " ती चुकचुकली. हातात चहाचा कप घेऊन बसली तोवर साडेसहा झाले होते. रातकिडे आताशा जरा जास्तच किरकिर करत होते. त्यांची मैफिलहि खिडकीशी जमते. खिडकी बंद केली तेव्हाच आवाज जरा दबला पण एकदा सवय झाली की पुन्हा मोठा वाटू लागतो.

"आई, किती भांडी लावतीयेस, डिशवॉशर भरून जाईल. मी पॉड टाकू.... असं का असतं, यात फॅन का आहे, मग भांडी कशी घासतो तो.... सांग ना कसा घासतो... स्क्रब सुद्धा नाहीये त्यात.... मी घासतो सिंक मध्ये तेव्हा...."

" ऋषी, अरे किती वटवट करतोस, जरा कामं उरकू दे मला.... "

"आई, तू म्हणतेस मी वटवट करतो पण ते क्रिकेट्स संध्याकाळी माझ्यापेक्षा जोरानं वटवट करतात त्यांना रागवत नाहीस तू.... "

अगदी वैतागलेली आदिती खुद्कन हसली होती. कालचा हा लेकासोबतचा संवाद आठवून आताही तिला हसू आलं. सहा वर्षाच्या मुलाचं डोकं चालतं कुठे नि कसं. आणि अगदी आपण जेरीस आल्यावर ह्याला बरं जमतं मूड हलका करायला. आताही ऋषी हवा होता. आताशा हे असंच होतं, समोर असतो तेव्हा वाटतं जरा मोकळा वेळ मिळत नाही आपल्याला आपला आणि घरी नसला तरी त्याची आठवण येते.कोपऱ्यातल्या देवापुढची समई आल्हाद प्रकाशत होती. अर्धवट उजेडात ही वेळ आधीच खूप विचित्र वाटते. कोण जाणे का आज समई पाहून तिला दापोलीच्या देवघराची आठवण आली.

तिथेही अशीच समई असे. खरंतर त्या समईची छोटी प्रतिकृती म्हणूनच तिनं ही समई घेतली होती. तिच्या हातात असतं तर इथंही तिनं अगदी दापोलीच्या घरासारखं घर बांधलं असतं ! ते घरही होतंच तसं छोटाशी वाडी पण लहान असताना तिचं सारं विश्व सामावलेलं असायचं तिथं. अंगणातून पडवी , पडवीतून सोपा, मधलं अंगण, माजघर, खोल्या नि मागचं दार, सारीकडे ती दिवसभर बागडत असायची. आजी म्हणायचीही तिला

" तीन महिने माझ्या घरात वावर येतं गोडुबाई नंतर भिंती खायला उठतात.... " कोकणातल्या वावराच्या गोष्टी ऐकून अंधारातल्या छोट्या छोट्या सावल्याही फार मोठ्या वाटायच्या आणि मग देवखोलीतली समई जरा जास्तच ऊबदार वाटायची. उन्हाळ्याची सगळी सुटी दापोलीत ती धमाल घालायची. आजीच्या घराच्या परसात तिच्या भरपूर आवडीच्या जागा होत्या. कोपऱ्यातली डाळिंबी, कुंपणांजवळच्या दोन पेरवा, ओळीत उभे माड, सरळसोट पोफळी हातधुणीच्या नळाजवळचं कर्दळीचं बेट आणि  हौदाचा दगड सगळ्यात आवडीची कोणती हे ठरवणं कठीण. न्हाणीतल्या गुळगुळीत दगडावर अंघोळ झाली की उभा दिवस आपला. आजी लावलेले पोहे द्यायची वाटीभर आणि तिच्याशी भांडून आदिती रवा-खोबऱ्याचा लाडू मागून घ्यायची.

"किती गोडघाशी गं बाई तू, आधी पोहे आटप. मग मिळेल लाडू" आजी दटावून द्यायची. आजीच्या खाऊघरात गोडधोडाचा डबा असे आणि आदिती आहे तोवर तो सतत भरलेला असे. आजीचा चहाही अगदी मिष्ट गोड असायचा. तोही गुळाचा. पोहे नि लाडू झाल्यावर आदितीच्या डोळ्यात चहा दिसायला लागायचा, आजीही समजून घेऊन लगेच पातेलं ठेवी. हातातल्या चहाच्या घोटानी अदितीची तंद्री भंगली. आता जागं राहायचं तर असा कडकडीत कडू चहा प्यावा लागतो. घड्याळ पाहिलं, सात वाजायला आले होते. अजून हे दोघे आले कसे नाहीत , तिच्या डोक्यात आलं. शेजारी पाजारी तशी जरा आज जास्तच हालचाल दिसत होती. डोकावून पाहिलं तर समोरच्या घरासमोर ठेवलेले भोपळे दिसले. "अरेच्च्या आज तारीख काय, तिनं पटकन कॅलेंडर पाहिलं... आज हॅलोविन आपण विसरलो कसे " संपलेल्या चहाचा मग तिनं स्वैपाकघरात ठेवला आणि फ्रीजवर आशिषने लिहिलेली नोट तिला दिसली.

" ट्रिक ऑर ट्रीट... ला जातो आहे, वेळ होईल.... " आदितीनं बऱ्याच वेळ फोन पाहिला नव्हता. आशिषला तिची ही सवय माहित होती, जेव्हापासून ती नोकरीला लागली होती, कामाच्या नादात हे जरा जास्त व्हायचं. तेव्हापासून त्यानं असे छोटे छोटे निरोप फ्रीजवर ठेवायला सुरवात केली होती.  हा पहिलाच हॅलोविन असेल कि आदिती ऋषीसोबत "ट्रिक ऑर ट्रीट" ला गेली नाही. गेली चार वर्ष, अगदी तो तान्हा असतानाही त्याला कँडीज गोळा करायला ती घेऊन गेली होती. त्याचं एक कारण हेही होतं की तिलाच त्या गोळ्यांचं भयानक वेड होतं. बॅगभरून आलेली गोळ्या चॉकलेटं ढीग करून फडशा पाडायचा, हा नियम झाला होता. "यावेळी पहिल्यांदाच ऋषी एकटा आहे, त्याला माझी आठवण येत असेल" तिला आणखीच वेगळं वाटलं. विचार झटकून ती उठली आणि कपडे बदलून काहीतरी काम हाती घ्यावं म्हणून तिनं लॅपटॉप उघडला तेवढ्यात बेल वाजली. दार उघडून बघते तर बाहेर भलीमोठी भुतावळ, आणि मोठ्ठ्यानं "ट्रिक ऑर ट्रीट" चा जल्लोष. काही दिवसांपूर्वी आणलेल्या गोळ्यांची पाकिटं तिनं ऋषीपासून लपवून ठेवली होती. ती काढून त्यातून प्रत्येकाच्या पिशवीत मूठभर गोळ्या ओतून ती आत आली. भुतं खूष होऊन उड्या मारत पुढचं घर शोधायला गेली आणि आदिती पुन्हा आत येऊन बसली.

" आजीनं ही भुतं पहायला हवी होती.... " तिच्या डोक्यात आलं. नकळत तिला हसू आलं. परसात आदितीला नवा उद्योग सापडला होता. जुनी मोडकी केरसुणी सुटी सुटी करून एकेक काडी तिनं वेगळी केली होती. शेजारच्या कुंपणावरचे काटे मोडून केरसुणीच्या काडीच्या उलट्या बाजूला खोचून तिनं त्याचे बाण केले होते आणि त्या बाणांनी केळीवर निशाण साधण्याचा खेळ चालू होता. केळीच्या मऊ खोडात, भल्यामोठ्या पानात की

घडावर कुठंही काटा टोचून बाण रुतला की उड्या मारणं चालू होतं. तास दोन तास अगदी एकाग्र चित्तानं हेच. बऱ्याच वेळ वावराची हालचाल नाही म्हणून आजी शोधत आली आणि हा उद्योग पाहून तिनं कपाळी हात मारला.

"अगं गधडे एवढीशी पोर तू, हे असले बाप्यांसारखे वांड उद्योग तुला सुचतात कुठून... माझ्या पोटुशा केळीला काट्यानं मारतेस काय, बरी सोकावलीस की, घड बांधून ठेवला गं मी. तुझ्या बाबाला केळफूल आवडतंय तरी खुडू दिलं नाही आणि तुझा हा प्रताप... थांब झोडते चांगली तुला" आजीनं आंगठे धरून उभं केलं. आजीचे डोळे अगदी आग ओकत होते. आदितीला घाबरून रडं फुटलं. आज काही आपलं खरं नाही, आदितीनं मनाशी गाठ बांधली. आजीनं चाराचा खाऊसुद्धा दिला नाही. मुसमुसून लाल लाल झालेले डोळे घेऊन आदिती परसाच्या पायरीवर येऊन एकटीच बसली. इतक्या वर्षात आजी एवढी कधीच रागावली नव्हती. लाडू चोरून खा, वाळत घातलेलं वाळवण पळव, धान्याची सांडासांड कर, अंगणात पाणी उडव, कावळ्यांना दगड मार असले प्रकार तिनं भरपूर केले होते. एरव्ही आजी काहीतरी रागवून सोडून द्यायची पण आज जरा जास्तच झालं होतं. वाडीत असं शांत बसायची तिची ही पहिलीच वेळ असावी. गुळगुळीत ठोक्याच्या पायरीवर बसून तिनं सारा परिसर न्याहाळला. कुंपणाची मऊमऊ शेवाळं पांघरलेली जुनी विटांची भिंत ही भिंत आतूनही तशीच मऊमऊ असेल तिला वाटलं. हौदाजवळचा पांढराफट दगड, हा दगड न्हाणीतल्याच दगडासारखा होता पण तो गुळगुळीत आणि हा रखरखीत. कोपऱ्यातलं फोफावलेलं अळू, आणि परस भरून घेरलेला हिरवा रंग. त्यातूनच केळी डोकावत होत्या. आदितीला अस्वस्थ वाटलं. सांजवातिची वेळ होत आली होती. सुटीही संपत आली होती. दापोलीत पावसाळ्याची चाहूल लागली की एकदोन वळीव होऊन जात. त्यांनंतर सारं बदलायला लागे. दाटलेल्या ढगांनी जीव गुदमरला की पावसाच्या मुंग्या येत. त्यांचे खचच्या खच पडू लागले की सुटी संपली हे गृहीत धरावं. बाबांबरोबर घरी जायच्या विचारांनी तिच्यात खळबळ होऊ लागे. आता त्या विचारांनी तिचा घसा खारट झाला.

पुन्हा एकदा बेल वाजली आणि तिची तंद्री भंग झाली. साडेसात वाजत आले होते. दार उघडलं तर पॅकेज आलं होतं. तिनं घेतलं आणि उघडून पाहिलं, दिवाळीला लावायच्या माळा आल्या होत्या. दिवाळीच्या दिवसात बाबांना जेव्हा ऋषीचे हॅलोवीनचे फोटो पाठवले तेव्हा बाबा रागावले.

"हे काय अभद्र गं दिवाळीच्या दिवसात आदू? अगं अंधाऱ्या रात्री दिवे लावावे की असं भुताचं सोंग घ्यावं... छे.... "

"अहो बाबा आज हॅलोविन आहे, इथली सर्वपित्री अमावस्या म्हणा ना... आज आपले सारे पूर्वज पृथ्वीवर परत येतात अशी या लोकांची समजूत आहे, त्यांना वाट दाखवायची म्हणून भोपळ्यात दिवे ठेऊन उजेड करतात आणि त्यांना आवडतात ते गोड पदार्थ करतात. त्यांच्यासोबत एखादी दुष्ट आत्मा आली तर भुताचं सोंग घेऊन तिला पळवून लावतात... बाकी हे सोंग मुलांना मजा म्हणून. आज गोळ्याचॉकलेटं दिली नाहीत तर भिववू तुम्हाला... ट्रिक ऑर ट्रीट करत मुलं घरोघरी जाऊन कँडीज गोळा करतात... म्हणजे आपण जायचो ना तिळगुळ द्यायला तसंच काहीसं"

"अरेच्च्या गोळ्या चॉकलेटं काय, मग ऋषीच काय माझ्या ऋषीमुनीची आईच आधी वाट्टेल ते सोंग घेऊन फिरेल... काय खरंय ना? आजीचं वावर आठवतंय ना? "

" अहो मग काय बाबा.... ढीगभर गोळ्या कोण सोडेल... आजीच्या खडीसाखरेची सर मात्र नाही त्यांना..."

दरवर्षी दिवाळी सांभाळत हॅलोविन यायचा, आताशा ऋषीला कळू लागल्यापासून कपड्यांची मागणी असे पण गोळ्या नि कँडीजच वेड त्यानं अगदी आईकडून उचललं होतं. नैवेद्याची खडीसाखर पळवायची आदिती, आजीच्या अंगवळणीच पडलं होतं ते. ज्या दिवशी आजी रागावली, त्याच्या दुसऱ्या दिवशी देवघरातली खडीसाखर जशीच्या तशी होती. आदिती गप्पगप्पशी बसून होती आणि बाबा दुपारच्या गाडीनं पोचणार होते.

आजी अंगणात गुलबक्षीच्या वेण्या करत बसली होती. एक पाय मुडपून मन लावून काम चालू होतं. आदिती तिच्याजवळ जाऊन बसली. गुडघ्यावर हनुवटी टेकवून तिनं आजीकडे पाहिलं आणि हळूच हाक मारली. आजीनं वर न पाहताच, हुंकार दिला. आदितीनं पुन्हा हाक मारली. आजीनं वर पाहिलं , हातातली वेणी संपवून तिनं ती हातात धरून पाहिली आणि आदितीच्या केसांवर माळली. आदिती धुसफुसली,

" आजी सॉरी ना गं... मी पुन्हा नाही असं करत... मला घरी नाही जायचं... आणि ही वेणी काढ बघू... मला नाही आवडत.... "

आजीनं तिच्या केसांवरून हात फिरवला. ती उठून निघून गेली. मागल्या दारी पायरीवर बसली. आजी तिच्याजवळ आली. तिच्या पाठीवरून हात फिरवून, शेजारी बसली.

" आदू तू पोटात होतीस ते नऊ महिने तुझ्या आईने इथेच काढले. तेव्हाच तिनं या केळी लावल्या. फार जपायची ती या झाडांना. तिचं नि या केळीच्या झाडांचं डोहाळेजेवण घातलं मी परसात. एरव्ही तुझ्यासारखीच वांड होती पण गर्भारपणात अगदी शांत झाली. तू आलीस ते तिचंच रूप घेऊन . पहिल्या वेळेच्या या सगळ्या माझ्या आठवणी आहेत बघ. दुसऱ्या वेळी तू दोन वर्षांची होतीस,त्याही वेळी केळीला फळ धरलं. पावसानं झोडलं आणि पडून गेलं. तुझी आई देवाकडे गेली तेव्हापासून न चुकता फळ धरतं आणि तिच्या आठवणी मी या अशा जप्त राहते. मी तुझ्यावर काल अंमळ जास्तच रागावले. सुटी संपत आली, बाबा एकटे आहेत. त्यांनाही तुझी ओढ लागली असेल. तेव्हा घरी जा, हे घर तुझंच आहे, आजी रागावली तरी आजीला तू हवी आहेस. "

आजीनं खडी साखरेची वाटी तिच्यापुढे धरली. तिनं डबडबल्या डोळ्यांनी साखर खाल्ली आणि आजीच्या कुशीत शिरली.

"अगो गोडाबाई आयुष्य हे असंच, थोडा आंबटपणा आल्याशिवाय खडीसाखरेची गोडी कळत नाही. एकदा ती घोळत राहिली ना जिभेवर की जे सुख असतं... ते ती साखर विरघळल्याशिवाय सापडेल कसं ?"

त्यानन्तर सहा महिन्यात आजी गेली. आदिती जेमतेम चौदा वर्षांची होती. दापोलीचं घर गेलं, सुट्या संपल्या, आयुष्य गाड्याला जुंपल्यागत धावू लागलं. आदिती शिकून लग्न करून अमेरिकेत आली. दारात किल्ली वाजली, आशिष आणि ऋषी परत आले. इवल्या हातांनी ऋषीने तिला मिठी मारली.

" आई आज आम्ही केवढ्या कँडीज गोळा केल्या माहिते का... आणि सावर पॅच आणि गमीज मी सगळे कॉलीनला दिले... मला आंबट लागतात ते... मग त्याने मला खूप साऱ्या एमेनेम दिल्या... एक्स्चेंज केलं आम्ही... "

"अरे पण आंबट कँडी खाल्ली नाहीस तर गोड कँडी कळेल कशी... "

" नाही, मला गोडच आवडते... "

"ओके जा अंघोळ करून ये.... मग कँडीज खायच्या... "

आशिषने दिव्याच्या मला लावल्या आणि कोरलेल्या भोपळ्यात पणती ठेवली. ऋषी अंघोळ करून थेट देवापुढे गेला, खडीसाखरेची वाटी उचलून घेऊन आला...

" आई आय विल स्टार्ट विथ इंडियन रॉक कँडी... मला हे रॉक्स सगळ्यात जास्त आवडतात.... "

आई आणि आजी दोघी वरून बघत असतील, आज हॅलोवीनला खालीही आल्या असतील. आदितीने साखरेचे दोन खडे दारात ठेवले. एक जिभेवर ठेवला, गोडव्यानं घसा खवखवला, डोळे भरून आले. दापोलीचे खडीसाखरी दिवस कधी विरघळून गेले ते कळलं नाही पण आठवणींचा हा गोडवा जिभेवर अविरत रेंगाळतोय तो कधीच संपू नये. मनातल्या मनात ती हसत राहिली.